# जाहिरात

## विधी अधिकारी
## विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग,
## कोकण भवन, नवी मुंबई

विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई या कार्यालयातील विधी अधिकारी हे पद करार (कंत्राटी) पध्दतीने तात्पूरत्या स्वरूपात ११ महिन्यांसाठी भरावयाचे आहे. त्याकरीता खाली विहीत करण्यात आलेल्या पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी **दिनांक ३०.०६.२०२५ रोजी सकाळी १२.३० वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४ येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | एकत्रित मानधन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | भरावयाचे पद |
|---|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी | रू. ४५,०००/- (रूपये पंचेचाळीस हजार मात्र)+ दूरध्वनी व प्रवास खर्च रू. ५,०००/- (रूपये पाच हजार मात्र) एकूण रू. ५०,०००/- ठोक वेतन | १. मान्यताप्राप्त विदयापीठाचा कायद्याचा पदवीधर असावा व तो सनदधारक असावा.<br>२. वकिली व्यवसायाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव<br>३.महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादीचे ज्ञान आवश्यक आहे. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.<br>४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.<br>५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ४५ वर्षापेक्षा अधिक नसावे. | ०१ |

## विधी अधिकारी यांची निवड

विधी अधिकारी यांची निवड विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहील. तसेच विभागीय आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

## सर्वसाधारण अटी व शर्ती :-

| | |
|---|---|
| १) | अ) सदर नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. सदरहू विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणला जाणार नाही. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| २) | सदर नेमणूक करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येईल. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती अधिकारी घेतील. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोर जावे लागेल. |
| ३) | संबंधित नियुक्ती प्राधिकारी शासनाचे वतीने नियुक्तीचे वेळी संबंधिताबरोबर विहीत प्रपत्रात करार करतील. निवड झालेल्या उमेदवारास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र. इएसटी/२०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दिनांक १४.११.२०१३ अन्वये परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेला करार करून दयावा लागेल. |
| ४) | करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत. |
| ५) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी असावा. |
| ६) | मुलाखतीसाठी येतांना मुळ कागदपत्र आणणे आवश्यक आहे. |
| ७) | सदर पदासाठी उमेदवाराने आपले संपूर्ण नाव, टपालाचा पूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, जन्मतारीख, डोमिसाईल प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता व अनुभव विषयक माहिती (Bio Data) समाविष्ट असेल अशा प्रकारे विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, पहिला मजला, नवी मुंबई ४०० ६१४ यांचे नावे सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत वय, शैक्षणिक अर्हता, जातीचा दाखला व अनुभव याबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करून सादर करावेत. उमेदवाराने अर्जावर आपला सक्षम प्राधिका-याने साक्षांकित केलेला फोटो चिकटवणे आवश्यक आहे. असा अर्ज **दिनांक २५.०६.२०२५ पर्यंत** कार्यालयीन वेळेत konkancomissioner.lawofficer@gmail.com या ई-मेल वर दाखल करावा. |
| ८) | प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी **दि. २७.०६.२०२५** रोजी सुचना फलकावर प्रसिध्द केली जाईल. अशा मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना वेगळे मुलाखत पत्र पाठविण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तथापि आपल्या अर्जात नमुद केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संदेश दिला जाईल. तरी आपण अर्जात आपला अचुक दुरध्वनी क्रमांक नमुद करावा. |
| ९) | या यादीतील पात्र उमेदवारांची मुलाखत **दि. ३०.०६.२०२५ रोजी सकाळी १२.३०** वाजल्यापासून घेतली जाईल. |
| १०) | वर निश्चित करून दिलेल्या दिवशी उपस्थित न राहीलेल्या उमेदवारांची तक्रार नंतर ऐकली जाणार नाही. |
| ११) | उमेदवारांनी मौखिक परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे. |
| १२) | एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात यईल. |
| १३) | विभागीय आयुक्त, कोकण यांनी कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. |
| १४) | सदर भरती प्रक्रिया निवडीच्या कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रद्द करणे इत्यादी अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत. |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| १५) | करारामधील कालावधीत नियुक्ती केलेले विधी अधिकारी यांनी सक्षम प्राधिका-याच्या विशेष परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/ व्यवसाय हे कायदेशीर सल्लागार म्हणून करता येणार नाहीत. |
| १६) | सदरची नियुक्ती ही वेळोवेळी संबंधित न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून असेल |

## विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदा-या

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे. वेळोवेळी संबंधित न्यायालयात उपस्थित रहाणे.

२) महसूल विषयक/ परिच्छेदनिहाय अभिप्राय (parawise comments) तयार करणे/ सेवाविषयक/ प्रशासकिय बाबी/ विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करावी.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर नोडल ऑफिसर म्हणून काम पहाणे.

८) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज **दिनांक २५.०६.२०२५** पर्यंत विहीत कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रतींसह konkancomissioner.lawofficer@gmail.com या ई मेल वर कार्यालयीन वेळेत दाखल करावेत.

क्र.मशा/कार्या-२/आस्था-२/जाहीरनामा/२०२५
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, नवी मुंबई
दिनांक :- १६.०६.२०२५

(स्थळ प्रत मा.विभागीय आयुक्त यांचे सहीची असे)

(वैशाली इंदाणी - उंटवाल)
अपर आयुक्त (महसूल), कोकण विभाग

Scanned with CamScanner

# <u>अर्जाचा नमुना</u>

## विधी अधिकारी
## विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग,
## कोकण भवन, नवी मुंबई

प्रति,

मा.विभागीय आयुक्त,
कोकण विभाग, कोकण भवन,
पहीला मजला, नवी मुंबई ४०० ६१४
(ई मेल आयडी – konkancomissioner.lawofficer@gmail.com)

अलिकडच्या काळातील फोटो

| | | | |
|---|---|---|---|
| | पदाचे नांव | :- | विधी अधिकारी, कोकण विभाग |
| | पद संख्या | :- | ०१ |
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | :- | ------------------------------------------------------------ (आडनांव) (प्रथम नांव) (वडील/पतीचे नांव) |
| २ | राष्ट्रीयत्व | :- | ------------------------------------------------------------ |
| ३ | जन्मतारीख | :- | ------------------------------------------------------------ |
| ४ | जातीचा तपशिल | -: | ------------------------------------------------------------ |
| ५ | टपालाचा संपूर्ण पत्ता | -: | ------------------------------------------------------------ |
| ६ | लिंग (पुरूष/ स्त्री) | -: | ------------------------------------------------------------ |
| ७ | मोबाईल क्रमांक | -: | ------------------------------------------------------------ |
| ८ | शैक्षणिक अर्हता | -: | ------------------------------------------------------------ |
| ९ | अनुभव | -: | ------------------------------------------------------------ |
| १० | जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशिल (कागदपत्रे स्वसाक्षांकीत करून अर्जासोबत स्कॅन करून ई मेल व्दारे पाठवावीत.) | -: | i) वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र सांक्षाकीत छायाप्रत<br>ii) जातीचा दाखला सांक्षाकीत छायाप्रत<br>iii) पदवी प्रमाणपत्र साक्षांकीत छायाप्रत<br>iv) अनुभव प्रमाणपत्र साक्षांकीत छायाप्रत<br>v) जन्माचा दाखला साक्षांकीत छायाप्रत |

<u>जाहिरनामा</u>

मी याव्दारे जाहिर करतो/ करते की, उपरोक्त नमूद केलेला तपशिल माझे ज्ञान आणि माहिती नूसार योग्य आणि सत्य आहे. कोणत्याही परिस्थितीत कोणतीही माहिती खोटी किंवा चुकीची आढळून आल्यास, माझी उमेदवारी/ नियुक्ती कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय रद्द/ संपुष्टात येण्यास पात्र राहील.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी